आहे. त्याचा विसर न पडू देता समाजापयोगी कामात हिरीरीने सहभागी व्हा. संशोधन क्षेत्रात मोठी संधी आहे. त्याकडे लक्ष ठेवा सर्वांना मदत करण्याचे धोरण अवलंबा कोणताही उद्योग व्यवसाय सुरू करा. यश तुमचेच आहे.

समारंभाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले आज ज्यांना पदवी मिळाली आहे. त्या सर्वांचे मी अभिनंदन करतो. तुम्ही पडेल ते काम करण्याची तयारी ठेवली तर प्रगती करण्यापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही. चांगले नागरिक बना. समाजाला व देशाला आपला अभिमान वाटावा अशाप्रकारचे कार्य आपल्या हातून व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आभार प्रा. सुभाष शिंदे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. सचिन कांबळे यांनी केले .

याप्रसंगी मोठया संख्येने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



**'निर्भय कन्या अभियान'**

वाघोलीः सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, विद्यार्थी विकास मंडळ व भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'निर्भय कन्या अभियान' कार्यशाळा पार पडली. या कार्यक्रमाच्या उद्‍घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रा. स्वाती राजन या उपस्थित होत्या. 'भयमुक्ती, मानसिक, बौद्धिक स्वावलंबन' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या उद्‍घाटन प्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की, 'काळ बदलत चालला, समाजात बदल होत आहे मुलींनी स्वसंरक्षणासाठी निर्भय होणे गरजेचे आहे.' मा. श्यामल थोरात, मा. वृषाली भागवत यांनी अन्याय व अत्याचाराचा मुकाबला कसा करावा याचे प्रात्याक्षिक घेतले तसेच, मुलींनी मानसिक दृष्टया सक्षम होण्यासंदर्भात प्रबोधनपर काही प्रात्याक्षिके करून दाखवली. श्री. अनिल केंगार महाराज यांचा आधुनिक भारूडाचा कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी उपस्थित होते. त्यांनी आपल्या मुली या मानसिक, शारीरिक दृष्टया सक्षम होणे ही काळाची गरज आहे असे सांगितले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक डॉ. ज्योतिराम मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रमासाठी डॉ.सुनील ठाकरे, प्रा. सचिन कांबळे, प्रा. शिवाजी सोनवणे, डॉ. भूषण फडतरे, डॉ.रमेश गायकवाड, प्रा. सुभाष शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास मंडळाचे सदस्य प्रा. शोभा कोकाटे यांनी केले तर आभार प्रा. हनुमंत जगताप यांनी केले.

**'राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन'**

वाघोलीः दि. २८.०२.२०१९ रोजी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली पुणे येथे राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त



विज्ञान विभागातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. आयुर्वेदिक वनस्पतीचे महत्त्व व आपल्या भारतीयांना मिळालेला हा आजीचा बटवा आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी किती मोलाचा आहे हे विद्यार्थ्यांनी पोस्टर द्‍वारे प्रदर्शित केले. 'इनोव्हेशन दॅट चेंज हयूमन लाईफ ' या विषयावर एकूण २१ पोस्टर व १७ प्रेझेंटेशन द्वारे ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. याच दिवशी आरोग्य व तंदुरूस्ती या विषयावर डॉ. बिजल जवेरी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेजर डॉ. अशोक गिरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. मनिषा बोरा, प्रा.दीपक अंजळ व प्रा.सुवर्णा पाटील यांनी केले तर डॉ. संजय गायकवाड, डॉ. देविदास पाटील व प्रा. शिवाजी सोनावणे यांनी परीक्षण केले.

तसेच, कु. सचिन पाटील या एम. एस्सी च्या विद्यार्थ्यांचा पोस्टर प्रेझेंटशन व कु. वर्षा शिर्के या द्वितीय वर्ष बीसीए (सायन्स)च्या विद्यार्थीनीचा पॉवर पांईट प्रेझेंटेशन मध्ये प्रथम क्रमांक आला. पाहुण्यांचा परिचय डॉ. रूपाली गुलालकरी यांनी, प्रास्ताविक प्रा. मनिषा बोरा व आभार डॉ. माधुरी देशमुख यांनी मानले तर सूत्रसंचालन कु. विद्या बोडके व कु. अर्चना वाळके यांनी केले.





**'बीजेएस, महाविद्यालयाचे विद्यार्थी गौरी शिवले व आकाश दरेकर यांचे स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश'**

वाघोली : भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील इतिहास विभागाची विद्यार्थिनी व राष्ट्रीय बॉक्सिंग विजेती खेळाडू कु. गौरी शिवले हिची महाराष्ट्र शासन विक्रीकर निरीक्षक पदी व रसायनशास्त्र विभागाचा विद्यार्थी कु. आकाश दरेकर याची सहाय्यक कक्षअधिकारी पदी निवड झाली. यापूर्वीच कु. गौरी शिवले ही पोलीस उपनिरीक्षक तर कु. आकाश दरेकर यांची उपशिक्षणाधिकारी म्हणून देखिल निवड झाली होती. हे दोघेही ग्रामीण भागातील असून त्यांनी आर्थिक अडचणीवर मात करत यश संपादन केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. शांतिलालजी मुथ्था, महाविद्यालयाचे प्राचार्य, मेजर डॉ. अशोक गिरी व उपप्राचार्य डॉ.किशोर देसर्डा, डॉ.एस.व्ही. गायकवाड, डॉ. बी.बी.लांडगे, प्रा. डी.आर.अंजळ, डॉ.रमेश गायकवाड, डॉ. संजय गायकवाड, डॉ. भूषण फडतरे इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी या सर्वांनी हार्दिक अभिनंदन केले.

BJS
Bharatiya Jain Sanghatana

# शांतिदूत

## कॉलेज वार्तापत्र

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
बकोरी फाटा, वाघोली, पुणे - ४१२ २०७
**वर्ष २०१८-१९, अंक २ , एप्रिल २०१९**
संपादक : प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी    कार्यकारी संपादक : डॉ. सिद्धेश्वर गायकवाड



**भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालया मध्ये प्राचार्य म्हणून मेजर डॉ. अशोक गिरी यांनी पदभार स्वीकारला.**

वाघोलीः दि. ०१.०२.२०१९ रोजी भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून मेजर डॉ. अशोक गिरी यांनी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांच्याकडून नुकताच कार्यभार स्वीकारला. मेजर डॉ. अशोक गिरी यापूर्वी गरवारे वाणिज्य महाविद्यालय कर्वे रोड, पुणे येथे सहयोगी प्राध्यापक पदावर कार्यरत होते.

मेजर डॉ. अशोक गिरी यांची शैक्षणिक कामगिरी अतिशय उत्कृष्ट आहे. त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहयोगाने १२५ शोध निबंधाचे लेखन वेगवेगळया संशोधन पत्रिकांमधून प्रकाशित केले आहेत. त्यांनी ३३ देशांना भेटी देत आपल्या संशोधन निबंधाचे सादरीकरण केले आहे. यामध्ये ऑस्ट्रेलिया (सिडनी) ऑस्ट्रीया (व्हिएन्ना) इ. ठिकाणी वाचलेले पेपर विशेष उल्लेखनीय आहेत. डॉ. अशोक गिरी यांनी वाणिज्य व व्यवस्थापन शाखेअंतर्गत १० संदर्भ पुस्तकांचे लेखन केले आहे.

**पुरस्कार व सन्मान :-** मेजर डॉ. अशोक गिरी यांना आतापर्यंत वेगवेगळे १५ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यापैकी सर्वात प्रतिष्ठेचा भारत सरकारचा संरक्षण खात्यामार्फत दिला जाणारा "Defense Secretary Commendation Award 2017" हा पुरस्कार प्राप्त झाला. त्यामध्ये प्रशस्तीपत्र, बॅच व रोख दहा हजार रूपये यांचा समावेश आहे. सदरचा पुरस्कार प्राप्त करणारे मेजर डॉ. अशोक गिरी हे मात्र महाराष्ट्र राज्यातून एकमेव व्यक्ती आहेत.

मेजर डॉ. अशोक गिरी यांना मागील २९ वर्षात पुणे महापालिकेसह ७ वेळा वेगवेगळया संस्थाकडून ''आदर्श शिक्षक पुरस्कार'' मिळाले आहेत.

सामाजिक कामे :- मेजर डॉ. अशोक गिरी यांनी शैक्षणिक कामाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत अनेक समाजोपयोगी उपक्रमात आपला सहभाग नोंदवला. त्यामध्ये उल्लेखनीय - व्यसनमुक्ती संदर्भात रॅलीचे आयोजन, वृक्षलागवड व संवर्धना संदर्भात जनजागृती करण्यासाठी १२५ कि.मी.ची सायकल रॅली, पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन आयोजनामध्ये सहभाग, वेगवेगळया क्रीडा स्पर्धामध्ये पंच म्हणून काम, कारगिल युद्धातील शहीदांच्या कुटुंबियांना मदत कार्य, युवकांना सैन्य व पोलिस दलात भरती होण्यासंदर्भात मार्गदर्शन यांचा समावेश आहे.

मेजर डॉ. अशोक गिरी यांचे आज अखेरपर्यत खालीलप्रमाणे विद्यार्थी वेगवेगळया दलात भरती झाले आहेत.

- ➢ भारतीय संरक्षण दल : ३६ विद्यार्थी (अधिकारी पदावर)
- ➢ महाराष्ट्र पोलीस दल : ४५ विद्यार्थी
- ➢ भारतीय हवाई वाहतूक व हवाई दल : २४ विद्यार्थी
- ➢ वेगवेगळया बँकामध्ये अधिकारी : ५१ विद्यार्थी

अशाप्रकारे अष्टपैलू व्यक्तिमत्व असणारे मेजर डॉ. अशोक गिरी यांचा सत्कार समारंभ भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या समारंभास डॉ.किशोर देसर्डा, श्री. सी. आय.कोचर, प्रा.संतोष भंडारी, श्री. सुरेश साळुंके, व सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना मेजर डॉ. अशोक गिरी म्हणाले, विद्यार्थी हा केंद्र बिंदु मानून त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रत्येक घटकाला बरोबर घेऊन मी वाटचाल करेन, महाविद्यालयाचा विकास हाच यापुढे आपला अजेंडा असेल मिळालेले हे पद एक संधी असून त्याचे सोनेच नव्हे तर प्लॅटिनम करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला. आपण एक प्राध्यापक, संशोधक, राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख म्हणून यशस्वी झालो आहोत. आता प्राचार्य म्हणून यशस्वी होण्यासाठी अविरत प्रयत्न करू तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शांतिलाल मुथ्था यांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवू अशी ग्वाही त्यांनी या प्रसंगी दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा हे होते. डॉ.संजय गायकवाड यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन डॉ. सिद्धेश्वर गायकवाड यांनी केले



**बीजेएस कॉलेजचे डॉ. रमेश गायकवाड'स्पुक्टो'पुणे जिल्हयाचे नवे अध्यक्ष**

वाघोली : दि. ०१ एप्रिल २०१९ भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली, पुणे येथील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रमेश अशोक गायकवाड यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना 'स्पुक्टो' पुणे जिल्हा अध्यक्षपदी दि. ३१.०३.२०१९ रोजी निवड झाली.

डॉ.रमेश गायकवाड हे १९९६ पासून भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक

म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आतापर्यंत दोन संशोधन प्रकल्प पूर्ण केले असून ते पुणे विद्यापीठाचे एम. फिल व पीएच.डीचे मार्गदर्शक म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थी पीएच.डी. चे संशोधन करत आहेत. डॉ.रमेश गायकवाड यांनी मागील दोन वर्षे स्पुक्टो पुणे जिल्हा सरचिटणीस म्हणूनही काम केले आहे. तसेच पुणे जिल्हा क्रीडा विभागाचे सलग तीन वर्षे सचिव म्हणून काम पाहिले आहे. डॉ.रमेश गायकवाड हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे क्रीडा मंडळ सदस्य म्हणून ही सध्या कार्यरत आहेत.

डॉ.रमेश गायकवाड यांच्या निवडीबद्दल भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शांतिलालजी मुथ्था, महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले आहे.



**'शेतकऱ्यांचा कल्याणकारी राजाछत्रपती शिवाजी महाराज'**

**इतिहास तज्ञ श्री. पांडुरंग बलकवडे**

शिवाजी महाराजांचे राज्य शेतकऱ्यांच्या कल्याणकारी दृष्टीवर आधारलेले असल्यानेच त्यांना 'रयतेचा राजा' असे म्हणतात असे इतिहास प्रसिद्ध अभ्यासक डॉ. पांडुरंग बलकवडे यांनी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील इतिहास विभागांतर्गत साजरी केलेल्या शिवजयंतीच्या निमित्ताने मत व्यक्त केले. पुढे ते म्हणाले स्वराज्याचा मुख्य कणा हा शेतकरी असून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा मोडत त्यांना समृद्ध केले. शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या अठरापगड जातीच्या लोकांना आपलेसे केल्यानेच त्यांनी स्वराज्यासाठी बलिदान देण्याची तयारी ठेवली हे हिंदवी स्वराज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहे. विद्यार्थ्यांमध्ये कु. काशिद श्रद्धा यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी होते. तर श्री. सुरेश साळुंके , उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, डॉ.एस.व्ही.गायकवाड कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भूषण फडतरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सहदेव चव्हाण यांनी तर आभार डॉ. सुनिल ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. भूषण फडतरे, प्रा.सचिन कांबळे, डॉ. आर. ए. गायकवाड, श्री. नरेंद्र सांळुके, कु. श्रद्धा काशिद, कु. राहुल जाधव यांनी केले.

**'आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न'**

वाघोली : भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी NDRF, सुदुंबरे, तळेगाव दाभाडे, पुणे येथील टीमने विद्यार्थ्यांना विविध आपत्तीत काम करायला पाहिजे याची प्रात्यक्षिके दाखविली. यामध्ये आग, अपघात, उष्माघात, प्राणी दंश अशा अनेक आपत्तीत कोणत्या प्रकारे आपण रूग्णांना काय उपचार दिले पाहिजेत हे प्रात्यक्षिकाद्वारे दाखविले NDRF तर्फे मा. एल. लॉरेन्स व त्यांच्या ९



व्यक्तींच्या टीमने हा संपूर्ण कार्यक्रम घेतला.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. ज्योतिराम मोरे व त्यांचे सदस्य प्रा. शोभा कोकाटे, प्रा. हनुमंत जगताप, तसेच IQAC डॉ. संजय गायकवाड, डॉ. सुनिल ठाकरे, प्रा. सचिन कांबळे यांचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान महत्त्वपूर्ण ठरले. सदर कार्यक्रमाचा ४५० विद्यार्थ्यांना व ४० प्राध्यापकांना लाभ झाला.



**बीजेएस महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न**

वाघोली : दि. १६.०२.२०१९ सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वास ठेवून जीवनाची वाटचाल केल्यास विद्यार्थ्यांना यश मिळते असा संदेश अर्जुन पुरस्कार विजेते मा. श्री. मनोज पिंगळे यांनी बीजेएस महाविद्यालयात आयोजित २४ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलनात दिला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालय प्रबंध समिती सदस्य मा. शांतिलालजी बोरा हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख आणि महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती सांगितली. महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष डॉ. सहदेव चव्हाण यांनी अहवाल वाचन केले.

प्रमुख पाहुणे मा. श्री. विष्णु सुरासे (मराठवाडा एक्सप्रेस म्हणून ओळखले जाणारे हास्यकवी) यांनी उपस्थितांसाठी मनोरंजनात्मक हास्यकाव्य सादर केले. शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मधील महाविद्यालयातील मा. माणिकराव सातव पाटील पुरस्कृत स्वर्गीय संदीप सातव पाटील आदर्श विद्यार्थी म्हणून श्री. प्रकाश सुनिल जवक आणि आदर्श विद्यार्थिनी कु. माधुरी दगा पाटील हिची निवड करण्यात आली. आदर्श शिक्षक पुरस्कार प्रा. सुभाष शिंदे व आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार श्री. अमर खराडे यांना देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सिद्धेश्वर गायकवाड आणि डॉ. माधुरी देशमुख यांनी केले तर आभार डॉ.सहदेव चव्हाण यांनी मानले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




**विज्ञान विषयक राष्ट्रीय परिषद**

वाघोली: दि. २२ व २३ जानेवारी २०१९ रोजी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र व विज्ञान विभागातर्फे आयोजित केलेल्या "E-Resources in Teching, Learning and Research" या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे मा. श्री.सुनिल मुथियान यांच्या हस्ते पार पडले. त्यांनी **'संगणकीय विज्ञानाचा विस्तार कितीही झाला तरी शिक्षकांची भूमिकाही महत्वाची असणार आहे, त्यासाठी शिक्षकांनी सर्वसमावेशक अशी योजना दैनंदिन अध्यापनाचे काम करताना ठरवायला हवी असे मत व्यक्त केले.'** या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा हे होते. या परिषदेचे आयोजन रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय गायकवाड आणि समन्वयक म्हणून डॉ. देविदास पाटील व डॉ. रूपाली गुलालकरी यांनी काम पाहिले. या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये डॉ.अविनाश वाघमारे, प्रा. रामदास पवार, श्री. भावसार कुशल, प्रा. संध्या ठक्कर व प्रा. पराग शहा यांनी संगणकीय साधनांचा वापर शिक्षकांनी तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन अध्ययन - अध्यापन व संशोधनासाठी कशा प्रकारे करावे या विषयी सखोल मार्गदर्शन केले. या चर्चासत्रात एकूण २२ शोधनिबंध प्रकाशित करण्यात आले. तसेच, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी शोधनिबंधाचे वाचन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विज्ञान विभाग प्रमुख प्रा. दिपक अंजळ, डॉ. माधुरी देशमुख, प्रा. शिवाजी सोनवणे, प्रा. एस.एस.पाटील, प्रा. ज्योती आखाडे व सर्व विज्ञान विभागातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मोनिका जैन, प्रा. धनश्री उदावंत यांनी केले. तर, प्रा. मनिषा बोरा यांनी आभार व्यक्त केले.

**वाणिज्यविषयक आंतरराष्ट्रीय परिषद**

वाघोली: दि. २२.०१.२०१९ रोजी भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागातर्फे आयोजित केलेल्या The Role of Technology In Sustainable Development या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे मा. श्री. मुथियान सुनिल यांच्या हस्ते पार पडले. त्यांनी **'भावी पिढीसाठी शाश्वत विकासाची गरज आहे'** याविषयी आपले विचार व्यक्त केले. या परिषदेसाठी विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांनी एकूण ८५ शोधनिबंध पाठविले आहेत. त्याच्या शोध निबंध पुस्तिकेचे उद्घाटन प्रमुख पाहुण्याच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा हे होते. या परिषदेचे आयोजन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. बळवंत लांडगे आणि समन्वयक म्हणून प्रा. राजाभाऊ जमदाडे यांनी केले. तसेच, सूत्रसंचालन डॉ.मोनिका जैन यांनी केले आणि आभार डॉ. देविदास पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी विकास अधिकारी श्री. सी. आय कोचर, एम. कॉम वर्गाचे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



**'मशरूम उत्पादनप्रशिक्षण'**

वाघोली: भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागात आळिंबी प्रशिक्षण दि. ३० जानेवारी २०१९ रोजी घेण्यात आले. त्यावेळी एकूण २७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या एक दिवशीय आळिंबी उत्पादन तंत्र (मशरूम उत्पादन) कार्यशाळेचे आयोजन वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. एन.पाटील यांनी केले. त्यावेळी त्यांनी मशरूमचे आपल्या आहारातील महत्त्व व त्याचे उत्पादन तंत्र याची माहिती देऊन, मशरूमचे उत्पादन हे शेतातील टाकाऊ कचऱ्यापासून तयार केल्यामुळे हवेतील प्रदूषण नियंत्रणासाठी सुद्धा फायदा होतो असे सांगितले व कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. किशोर देसर्डा यांनी मार्गदर्शन केले व प्रा. आरती सरोदे व श्री. सचिन कुलकर्णी यांनी मोलाचे सहकार्य केले.



**भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पदवीग्रहण समारंभ संपन्न**

वाघोली : दि. १३.०२.२०१९ भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली, पुणे येथे आज चौथा पदवीग्रहण समारंभ पार पडला. एकूण २०२ स्नातकांना पदवीप्रमाणपत्राचे वितरण समारंभपूर्वक करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परीक्षा विभाग प्रमुख प्रा. दीपक अंजळ यांनी केले. त्यांनी मान्यवरांचे व स्नातकांचे स्वागत केले. अतिथी म्हणून डॉ. एस.एन.पठाण. (माजी शिक्षण संचालक व उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य) उपस्थित होते.

स्नातकांना मार्गदर्शन करताना डॉ. पठाण म्हणाले आपण एक वेगळया महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली आहे. ज्या महाविद्यालयाची सुरूवात सामाजिक बांधिलकी मधून झाली आहे. आपणही समाजाचे देणे लागतो. याचे भान ठेवून वाटचाल करा. जीवनात अनेक संघर्षाचे प्रसंग येतील डगमगू नका. सकारात्मक विचारांची कास धरा, आई- वडिलांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करा. कोणत्याही कामाजी लाज बाळगू नका. सतत शिकत रहा, तुम्ही यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही.

समारंभाचे स्वागताध्यक्ष भारतीय जैन संघटनेच्या प्रबंध समितीचे अध्यक्ष श्री. विलासजी राठोड म्हणाले, ज्या पद्धतीने भारतीय जैन संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष श्री. शांतिलाल मुथ्थांचे कार्य चालू



**कस्तुरबा गांधी यांची ७५ वी पुण्यतिथी**

वाघोली : भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, राज्यशास्त्र विभाग व इतिहास प्रेमी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आगाखान पॅलेस, पुणे येथे कस्तुरबा गांधी यांच्या ७५ व्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमप्रसंगी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती रोहिणी हट्टंगडी उपस्थित होत्या. आगाखान पॅलेस येथील कस्तुरबा गांधी यांच्या समाधी दर्शनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. या कार्यक्रमप्रसंगी बोलताना रोहिणीताई म्हणाल्या, की कस्तुरबा गांधी या एका महान व्यक्तीच्या पत्नी होत्या. म्हणून त्या महात्मा गांधीच्या मागे फरफटत गेल्या नाहीत तर त्या चालत गेल्या. त्यांची स्वतःची काही तत्वे होती. त्याप्रमाणे त्या जगल्या. अनेकदा गांधी व कस्तुरबा यांच्यात तात्विक वाद होत असत. गांधी चित्रपटाच्या निमित्ताने काही काळ का होईना मी कस्तुरबा जगले आणि त्यांचे विचार अभ्यासले.

या कार्यक्रमप्रसंगी श्री. मोहन शेटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्रीमती शेटे यांनी प्र. के. अत्रे यांचे कस्तुरबा संदर्भातील भाषण वाचले तर याप्रसंगी रोहिणीताईंची मुलाखत घेण्यात आली. या कार्यक्रमाला आगाखान पॅलेस येथे कॉलेजमधून ३० विद्यार्थी व प्रा. समिता हांडे उपस्थित होते. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी पॅलेसमधील ऐतिहासिक नोंदीचा अभ्यास केला.



**'राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिर समारोप डोंगरगाव येथे संपन्न'**

शुक्रवार, दि. ०८.०२.२०१९ या दिवशी प्रथम सत्रात सामाजिक सर्वे केला गेला. द्वितीय सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप पार पडला या प्रसंगी श्री. रामभाऊ दाभाडे, माजी जिल्हा परिषद सदस्य तसेच इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे मेजर रमेश विठ्ठल कुलकर्णी प्रमुख व्याख्याते म्हणून लाभले. श्री. रामभाऊ दाभाडे यांनी विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन करताना पर्यावरण संवर्धन, सामाजिक, जाणिवा, वृक्षारोपण, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण सामाजिक वातावरण या विषयावर प्रबोधन केले. तर मेजर रमेश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध श्रमसंस्कार शिबिरातून आलेले अनुभव आयुष्यात कसे उपयोगी पडतील व राष्ट्रउभारणीत हेच युवक कसे हातभार लावतील याविषयी संवाद साधला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी श्रमसंस्कार शिबिरातून श्रमसंस्कार या विषयावर संवाद साधला. या कार्यक्रमात महिला दिनानिमित्त गावातील ५ महिलांचा सत्कार करण्यात आला.

डोंगरगावातून या कार्यक्रमास आजी- माजी सरपंच, सदस्य व ग्रामस्थ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक, बीजेएस महाविद्यालयाचे प्राध्यापक उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन प्रा. सुभाष शिंदे, तर, आभार प्रदर्शन प्रा. विवेकानंद टाकळीकर, सूत्रसंचालन प्रा. समिता हांडे यांनी केले.



**इंदापूर महाविद्यालयातील ०५ दिवसीय राज्यस्तरीय शिबिरात बीजेएस कॉलेजच्या ०३ विद्यार्थ्यांचा सहभाग**

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष महाराष्ट्र शासन, मुंबई, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सलग समपातळी चरखुदाई प्रशिक्षण शिबिर ' दि. ०३.०४.२०१९ ते दि. ०७.०४.२०१९ या दरम्यान होत आहे. यासाठी भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातून ०३ विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी होत आहेत. परिसर स्वच्छता , वृक्षारोपणाकरिता खड्डे, सलग समपातळी चरखुदाई प्रशिक्षण, इत्यादी कामे या ठिकाणी हे विद्यार्थी करणार आहेत.

**'भाषाविषयक राज्यस्तरीय चर्चासत्र'**

वाघोली: सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ पुणे व भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी 'बहुभाषिक व बहुसांस्कृतिक भारतात अनुवादाची गरज' या विषयावर भाषा विषयक राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रा. डॉ. सदानंद भोसले (सा. फु. पुणे विद्यापीठ, पुणे बी. ओ. एस.चेअरमन - हिंदी) यांच्या हस्ते करण्यात आले. आज अनुवाद काळाची गरज आहे याविषयी त्यांनी आपले विचार व्यक्त केले. डॉ. राजेंद्र खैरनार (सदस्य बी. ओ. एस. हिंदी पुणे विद्यापीठ) यांनी ही या प्रसंगी आपले विचार व्यक्त केले.




इंग्रजी विषयाचे प्रमुख व्याख्याते डॉ. माधुरी गोखले, डॉ. अनघा भट, डॉ. कैलास औटे यांनी इंग्रजी विषयातील अनुवादाचे स्वरूप व तत्त्वे या विषयावर मार्गदर्शन केले. याशिवाय मराठी विषयातील डॉ. सुप्रिया सहस्त्रबुद्धे, डॉ. संजय घोडेकर यांनी मराठी अनुवाद नियम पद्धती यांचा आढावा घेतला.

या चर्चा सत्रामध्ये डॉ.प्रदीप सरोदे, डॉ. नानासाहेब जावळे, यांनी लेख वाचन केले. तर डॉ. अच्युत शिंदे, डॉ.पराग चौधरी, प्रा. बाबासाहेब भुजाडे, आदी प्राध्यापक उपस्थित होते. चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी प्रा. डॉ. गजानन चव्हाण यांनी हिंदी अनुवाद पद्धती व लेखन याची चिकित्सात्मक मांडणी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर देसर्डा होते. चर्चासत्राचे आयोजन समन्वय डॉ. सिद्धेश्वर गायकवाड, डॉ. जगदीश आवटे, डॉ.मोनिका जैन यांनी केले. डॉ. सहदेव चव्हाण, प्रा. शोभा कोकाटे, प्रा. अरविंद कुटे, प्रा. मैना औटे, प्रा. सचिन कांबळे , प्रा. दिपक कांबळे, श्री. शशिकांत केसकर, श्री. गिरीश शहा, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



**सदाशिव साळुंके यास रौप्य पदक**

औरंगाबाद येथे झालेल्या राष्ट्रीय कुराश स्पर्धेमध्ये भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील खेळाडू कु. सदाशिव साळुंके याने १०० किलो वजन गटामध्ये रौप्यपदक मिळविले. सदर स्पर्धा दि. ३० मार्च ते २ एप्रिल २०१९ या कालावधीत पार पडल्या. विजयी खेळाडू कु. सदाशिव साळुंके तसेच शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले




**राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत बीजेएस महाविद्यालयास विजेतेपद**

वाघोली : एम. आय. टी. विद्यापीठ, लोणीकाळभोर येथे तिसऱ्या राज्यस्तरीय विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर स्पर्धेचे उद्‌घाटन आंतरराष्ट्रीय खेळाडू सौ. ललिता बाबर यांच्या हस्ते झाले.

कबड्डी स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून संघ सहभागी झालेले होते. बीजेएस महाविद्यालयाने या स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केले. याचबरोबर बॉक्सींग या क्रीडा प्रकारात कु. भाग्यश्री शितोळे या खेळाडूने सुवर्णपदक मिळविले तर कु. वैष्णवी सातव या खेळाडूने रौप्य पदक मिळविले.वरील सर्व खेळाडूं व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रमेश गायकवाड यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



**सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. सूरज बनसोडे यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट**

वाघोली : दि. ०३.०३.२०१९ रोजी भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय वाघोली, पुणे येथे लोणीकंद पोलिसस्टेशनचे नव्याने रूजू झालेले सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. सूरज बनसोडे यांनी सदिच्छा भेट देऊन स्पर्धा परीक्षा विभाग व महाविद्यालयाची माहिती जाणून घेतली तसेच महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, डॉ. संजय गायकवाड, डॉ. सिद्धेश्वर गायकवाड, डॉ. जगदीश आवटे, प्रा. दिपक अंजळ, प्रा. सचिन कांबळे, इ मान्यवर उपस्थित होते.

संपादक - प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी
कार्यकारी संपादक - प्रा. डॉ. सिद्धेश्वर गायकवाड
सदस्य - प्रा. डॉ. मोनिका जैन, प्रा. शोभा कोकाटे
शांतिदूत संपादक मंडळ

विनामूल्य वाटप करण्यासाठी शांतिदूत हे भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे वार्तापत्र संपादक प्राचार्य मेजर डॉ. अशोक गिरी यांनी प्रकाशित करून कार्यकारी संपादक प्रा. डॉ. सिद्धेश्वर गायकवाड यांनी प्रसिद्ध केले. अंक सजावट व मुद्रण : श्री राज प्रिंटर्स मुद्रणालय, पुणे.